# जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर

जिल्हा सेतु समिती

Email ID - mahaferfarnagar@gmail.com
Website: - https://ahilyanagar.maharashtra.gov.in

क्रमांकः सेतु समिती/का.वि.45/2026
अहिल्यानगर, दिनांक:10/08/2026

**वाचावेः** 1. शासन निर्णय क्रमांक मातंसं-1716/प्र.क्र.517/39 दिनांक 19 जानेवारी, 2018
2. शासन निर्णय क्रमांक आसेंके-1725/प्र.क्र.86/मातं(39), दिनांक 27 मार्च 2025
3. शासन शुध्दीपत्रक क्रमांक मातंसं-048/प्र.क्र.1/2025, दिनांक 02 जुन 2025
4. शासन शुध्दीपत्रक क्रमांक आसेंके-2026/प्र.क्र.98/TECH-(E-1742666), दिनांक 09 जूलै 2026

---

महाराष्ट्र शासनाच्या उपरोक्त शासन निर्णयातील निर्देशांनुसार अहिल्यानगर जिल्हयातील ग्रामपंचायत क्षेत्रासाठी 2345, नगर पंचायत/ नगर परिषद क्षेत्रासाठी 54 व महानगरपालिका क्षेत्रासाठी 31 नवीन आपले सरकार सेवा केंद्र आयडी प्रदान करण्यासाठी दिनांक 22 जून 2026 ते दिनांक 06 जूलै 2026 या कालावधीत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आलेले होते. तसेच ज्या ग्रामपंचायत क्षेत्रासाठी एकही अर्ज प्राप्त झालेला नाही अशा 88 ग्रामपंचायत ठिकाणी पुन्हा अर्ज सादर करण्यासाठी दिनांक 17 जूलै 2026 पावेतो मुदतवाढ देण्यात आलेली होती.

सदरची प्रक्रिया शासन शुध्दीपत्रक दिनांक 02 जून 2025 मधील निर्देशांनुसार राबविण्यात येत होती. तथापि, शासनाने दिनांक 09 जूलै 2026 च्या शुध्दीपत्रकान्वये दिनांक 02 जून 2025 च्या शुध्दीपत्रकात बदल केला असुन, मा.मंत्री, महसूल, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक 15 जूलै 2026 रोजी झालेल्या व्हिडीओ कॉन्फरन्स बैठकीमध्ये सदर नवीन शुध्दीपत्रकानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

यास्तव, आपले सरकार सेवा केंद्र प्रदान करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने दाखल अर्जामध्ये नवीन शुध्दीपत्रकातील निकषांनुसार कागदपत्रांची पुर्तता करणेकामी तसेच नव्याने अर्ज दाखल करण्यासाठी खालीलप्रमाणे वेळापत्रक जाहीर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | वेळापत्रक | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| 1. | जाहिरात, अटी व शर्ती संकेतस्थळावर प्रसिध्द करणे | दिनांक 12 ऑगस्ट 2026 |
| 2. | ऑनलाईन अर्ज दाखल करण्याची तारीख | दिनांक 13 ऑगस्ट 2026 ते दिनांक 12 सप्टेंबर 2026 सायंकाळी 06.00 पर्यंत |
| 3. | प्राप्त अर्जाची माहिती जिल्हा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची तारीख | दिनांक 16 सप्टेंबर 2026 |
| 4. | छानणी अंती पात्र/अपात्र अर्जाची माहिती जिल्हा संकेतस्थळावर प्रसिध्द करणे | दिनांक 30 सप्टेंबर 2026 |
| 5. | रिक्त जागांपेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास, अर्जदारांची मुलाखत/लेखी परीक्षा घेणे आवश्यक असलेल्या पात्र अर्जदारांची अंतिम यादी जिल्हा संकेतस्थळावर प्रसिध्द करणे | दिनांक 12 ऑक्टोबर 2026 |
| 6. | पात्र अर्जदारांची मुलाखत / लेखी परीक्षा घेणे | संकेतस्थळावर सुचनापत्राद्वारे सुचित करण्यात येईल. |

www.MHAlerts.com

More info: MHAlerts.Com

# आपले सरकार सेवा केंद्रासाठी अर्ज करणेकामी सुधारीत अटी व शर्ती :-

1. अर्जदाराचे वय किमान 18 वर्ष असावे व तो किमान 12वी उत्तीर्ण असावा. तसेच अर्जदारास मराठी व इंग्रजी भाषांचे ज्ञान असावे.
2. आपले सरकार सेवा केंद्रासाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्विकारले जातील. ऑफलाईन अर्ज ग्राह्य धरले जाणार नाही. ऑनलाईन अर्ज करण्यासाठी https://ahilyanagaraaplesarkar.com या संकेतस्थळास भेट द्यावी.
3. आपले सरकार सेवा केंद्र विषयक शासनाने निर्गमित केलेले शासन निर्णय दिनांक 19 जानेवारी 2018, 25 मार्च 2025 व शासन शुध्दीपत्रक 09 जूलै 2026 नुसार सर्व अटी व शर्ती अर्जदारांना लागु असतील. शासन निर्णय दिनांक 19 जानेवारी 2018 मध्ये नमुद आपले सरकार सेवा केंद्र चालकांची कर्तव्ये व जबाबदा-या खालीलप्रमाणे असुन ते अर्जदारांना लागु असतील.

   i. शासनाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार आपले सरकार सेवा केंद्र चालू ठेवून नागरिकांना सेवा पुरविणे.

   ii. शासनाने ठरवून दिलेले ब्रँडिंग चा वापर करणे तसेच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाने स्थापन केलेल्या हेल्पलाईन क्रमांकाचा तपशील आपले सरकार सेवा केंद्राच्या दर्शनी भागावर प्रसिद्ध करणे.

   iii. शासनाने ठरवून दिलेले दर केंद्रावर प्रसिद्ध करणे तसेच ठरवून दिलेल्या दरापेक्षा अधिक शुल्काची आकारणी न करणे.

   iv. शासनाने पुरविलेल्या वस्तू, आज्ञावली इ. चे योग्य वापर, संरक्षण व जतन करणे.

   v. सर्व ग्राहकांना सौजन्याची वागणूक देणे आणि आवश्यक मदत व सहकार्य करणे.

   vi. विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत ठरवून दिलेले वेळापत्रक व निर्देश काटेकोरपणे पाळणे.

   vii. पर्यवेक्षीय संस्था, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाने निश्चित केलेल्या कार्यपद्धतीनुसार माहिती पुरविणे व दिलेल्या निर्देशांचे पालन करणे.
4. शासन शुध्दीपत्रक दिनांक 09 जूलै 2026 नुसार अर्जदार यांना अर्ज भरतेवेळी पोलीस पडताळणी सादर करणे बंधनकारक आहे.
5. अर्ज करण्यासाठी भौगोलिक क्षेत्र ज्या गावासाठी अर्ज केला आहे ते गाव असेल. अर्जदार हा त्याच गावचा रहिवासी असणे बंधनकारक आहे.
6. महानगरपालिका क्षेत्रात ज्या भाग/प्रभागासाठी अर्ज केला आहे, तेथेच आयडी सुरु ठेवणे क्रमप्राप्त आहे.
7. अर्जदार हा उपरोक्त नमुद भौगोलिक क्षेत्राचा रहिवासी आहे हे सिध्द करण्यासाठी रहिवास पत्त्याचा पुरावा म्हणुन ग्रामपंचायत दाखला, तहसिलदार रहिवास प्रमाणपत्र, मतदार ओळख पत्र, ग्रामपंचायत/नगरपालिका/महानगरपालिका मालमत्ता पत्रक इत्यादी पैकी एक पुरावा गृहित धरण्यात येईल.
8. एका अर्जदाराला केवळ एकाच ठिकाणी अर्ज करता येईल. यापुर्वी आपले सरकार सेवा केंद्र आयडी असलेल्या व्यक्तीस नवीन केंद्रासाठी अर्ज सादर करता येणार नाही. अर्जदाराने एकापेक्षा जास्त अर्ज दाखल केल्याचे निदर्शनास आल्यास सदर सर्व अर्ज रद्द करण्यात येतील.
9. शासकीय/निम शासकीय सेवेत असणारे अथवा सार्वजनिक उपक्रम/महामंडळाचे अधिकारी/कर्मचारी व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींना (पती अथवा पत्नी) आपले सरकार सेवा केंद्रासाठी अर्ज सादर करता येणार नाही.
10. विवाहित स्त्रीयांनी अर्ज सादर करतांना नावात बदल असल्यास पुराव्यासह (गॅझेट/विवाह दाखला) अर्ज सादर करावा. विवाहित स्त्रीयांचा विवाहानंतरचा रहिवास पुरावा गृहित धरण्यात येईल.
11. अर्ज भरण्यासाठी तांत्रिक सहाय्यासाठी जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक (DPM), जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर व जिल्हा समन्वयक (महा-आयटी), जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांचेशी संपर्क साधावा. इतर त्रयस्थ व्यक्तीशी संपर्क साधु नये, तसे निदर्शनास आल्यास अर्ज अपात्र ठरविणेत येईल.
12. जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांचेकडील अधिसुचना क्र.कार्या/सेतु समिती/149/2025 दिनांक 28/07/2025 अन्वये या जाहिरातीपुर्वी प्राप्त सर्व ऑफलाईन स्वरुपातील अर्ज निकाली ठेवणेत आलेले आहेत. सदर अर्ज या प्रक्रियेत विचारात घेतले जाणार नसुन, अर्जदार यांनी नव्याने ऑनलाईन स्वरुपात अर्ज सादर करावेत.
13. अर्जामध्ये जर चुकीची माहिती नमुद केली असेल तर सदर अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच चुकीची माहिती सादर करणे व शासनाची दिशाभुल केल्याप्रकरणी विहित कलमांनुसार कायदेशीर कारवाई करणेत येईल.
14. जिल्हाधिकारी यांचे अधिनस्त समितीस अर्ज छाननीबाबत सर्व अधिकार असतील

www.MHAlerts.Com

More info: MHAlerts.Com

15. सदर प्रक्रियेतील प्राप्त अर्जांवर छाननी करुन अर्ज स्विकारणे अथवा नाकारण्याचे अंतिम अधिकार जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांचेकडेस राखुन ठेवण्यात आले आहेत.
16. आपले सरकार सेवा केंद्र आयडी मिळाल्यानंतर चालकास शासनाचे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडील वेळोवेळी येणारे आदेश मान्य करावे लागतील.
17. अर्जदारास आपले सरकार सेवा केंद्र मंजुर झाल्यानंतर, ते मंजुर ठिकाणीच चालविणे बंधनकारक आहे. आपले सरकार सेवा केंद्राचे मंजुर ठिकाण मा.जिल्हाधिकारी यांचे परवानगीशिवाय बदलता येणार नाही. तसे केल्यास संबंधीत आपले सरकार सेवा केंद्र कायमस्वरुपी बंद करणेत येईल.
18. आपले सरकार सेवा केंद्र चालकास आयडी मंजुर झाल्यानंतर हस्तांतरित करता येणार नाही. तसे निदर्शनास आल्यास सदर आयडी रद्द करण्यात येईल.
19. शासनाच्या सर्व सेवा, लोकसेवा हक्क अधिनियम 2015 अंतर्गत अधिसुचित केलेल्या सर्व सेवा व शासनाने वेळोवेळी नवीन धोरणांनुसार निर्गमित केलेल्या सेवा आपले सरकार सेवा केंद्रातून देणे अनिवार्य राहील.
20. प्राप्त अर्जांची छाननी शासन शुध्दीपत्रक दिनांक 09 जूलै 2026 मधील नमुद गुणांकन पध्दतीनुसार सेतू प्रभारी अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर व जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे संयुक्तरीत्या पार पाडतील.
21. शासन शुध्दीपत्रक दिनांक 09 जूलै 2026 मध्ये नमुद असलेप्रमाणे ग्राहक सेवा व संवाद कौशल्य तपासण्यासाठी 20 गुणांची मुलाखत घेणेबाबत नमुद केले आहे. तथापि, अर्जांची संख्या विचारात घेता मुलाखत प्रक्रिया राबविणे शक्य नसल्याने जिल्हा सेतु समितीच्या दिनांक 27 जूलै 2026 च्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार लेखी परीक्षा घेण्यात येईल.
22. छाननी प्रक्रियेनंतर आयडी प्राप्त झाल्यावर आपले सरकार सेवा केंद्र चालकाने 2 महिन्यांच्या आत केंद्र सुरु करावे. अन्यथा सदर केंद्र रद्द करण्यात येईल. तसेच आयडी प्राप्त झाल्यावर सदर आयडीवरुन 3 महिन्यांपेक्षा जास्त कालावधीत व्यवहार न झाल्यास सदर आयडी कायमस्वरुपी बंद करण्यात येईल.
23. शासन निर्णय क्रमांक आसेकें-2026/प्र.क्र.63/मात (E-1602482) दिनांक 23 जून 2026 नुसार आपले सरकार सेवा केंद्रांकरिता राज्यव्यापी समान ब्रँडिंग, पायाभूत सुविधा मानके व संनियंत्रण कार्यप्रणाली निश्चित करण्यात आलेली आहे. त्याचे पालन करणे बंधनकारक राहील. तसेच लोकसेवा हक्क अधिनियम 2015 अंतर्गत अपिल बाबत फलक दर्शनी भागात लावणे, सेवानिहाय रेट चार्ट दर्शनी भागात लावणे आवश्यक राहिल. तसेच नागरिकांसाठी बसण्याची सोय व आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता करावी लागेल.
24. संबंधित उप विभागीय अधिकारी व तहसिलदार यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन करणे बंधनकारक राहील. तसेच केंद्राबाबत माहिती/अहवाल मागविल्यास तात्काळ सादर करावा लागेल. VLE MIS अहवाल दर महिन्याच्या 5 तारखेपर्यंत उप विभागीय अधिकारी यांचेकडेस सादर करणे बंधनकारक राहील.
25. सर्व प्रकारचे डिजिटल पेमेंटला प्राधान्य दयावे लागेल.
26. शासनाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार आपले सरकार सेवा केंद्र सुरु ठेवावे लागेल.
27. महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ यांनी नियुक्त केलेला तांत्रिक अधिकारी हे आपले सरकार सेवा केंद्र ची संपूर्ण चौकशी करु शकतील.
28. नागरिकांची जिल्हाधिकारी कार्यालय अथवा क्षेत्रीय कार्यालयात तक्रार आल्यास, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अभिप्राय कक्षात तक्रार प्राप्त झाल्यास आपले सरकार सेवा केंद्राची चौकशी करुन त्यावर कारवाई करणेत येईल.
29. आपले सरकार सेवा केंद्राकरीता कोणत्याही शासकीय परिसरामध्ये जागा मिळणार नाही याची नोंद घ्यावी.
30. रिक्त जागांची माहिती महा-आयटी कडील डाटा नुसार प्रत्येक गावनिहाय मॅप करुन तयार करण्यात आलेली आहेत. सदर जागांमध्ये कमी-अधिक असा बदल करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांचे असतील.
31. अर्ज प्रणालीबाबत तांत्रिक तक्रारी असल्यास अथवा सेतु केंद्र देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील किंवा इतर त्रयस्थ व्यक्तीने पैशाची मागणी केल्यास अथवा सदर प्रक्रियेबाबत इतर कोणत्याही स्वरुपाच्या तक्रारी असल्यास जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ‘अभिप्राय कक्ष’ येथे **0241-2310061** या क्रमांकावर तक्रार दाखल करावी.
32. वरील सर्व अटी व शर्ती अर्जदार/केंद्र चालक यांच्यावर बंधनकारक असून याबाबत भविष्यात अर्जदार/ केंद्र चालक यांची कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

www.MHAlerts.Com
More info: MHAlerts.Com

33. आपले सरकार सेवा केंद्र मंजुरीबाबतचा अंतिम अधिकार जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा सेतु समिती, अहिल्यानगर यांचेकडेस राखून ठेवलेला आहे.
34. संपुर्ण प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अर्जदारांनी वेळोवेळी https://ahilyanagar.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर सुचना/निर्देश बघावे, या संदर्भात या कार्यालयाकडून स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही किंवा भ्रमणध्वनी वरून संपर्क साधला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
35. नागरिकांची माहिती पोर्टलवर भरतेवेळी संबंधित अर्जदार याचा मोबाईल क्रमांक नमुद करणे अनिवार्य आहे. जेणेकरुन नागरिकांना त्याच्या अर्जाची प्रत्येक टप्प्यावरील माहिती अवगत होईल.
36. अर्जदार यांनी ऑनलाईन अर्ज दाखल करतांना अटी व शर्तीचे काळजीपुर्वक वाचन करुन अर्ज दाखल करावा. अर्ज अपात्र/बाद झाल्यास दुरुस्तीची संधी दिली जाणार नाही.
37. दिनांक 18/06/2026 रोजी प्रसिध्द जाहीरनाम्यानुसार आपले सरकार सेवा केंद्रांसाठी दाखल अर्जदार यांना रु.100/- इतके अर्ज शुल्क लागु करण्यात आले होते. त्याव्यतिरिक्त नवीन अर्जदार यांना रु.100/- इतके अर्ज शुल्क जमा करणे बंधनकारक राहील. याव्यतिरिक्त अर्जदारांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील अथवा इतर कोणत्याही त्रयस्थ व्यक्तींशी/एजंटशी आर्थिक व्यवहार करु नये.
38. जाहिरातीमध्ये नमुद रिक्त जागांमध्ये ज्या गावांची नावे नमुद नाहीत, अशा ठिकाणी लोकसंख्येच्या निकषानुसार आपले सरकार सेवा केंद्र यापुर्वीच उपलब्ध असल्याने अशी गावे नमुद केलेली नाहीत. तथापि, दिनांक 18/06/2026 रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या रिक्त जागांपैकी ज्या गावी एकही केंद्र देय नाही, अशा ठिकाणासाठी दाखल केलेले अर्ज रद्दबातल ठरविणेत येतील.
39. ऑनलाईन अर्ज दाखल करतांना आवश्यक कागदपत्रांच्या 1mb क्षमतेच्या Image file (.jpg.jpeg.png) अपलोड कराव्यात, PDF file अपलोड करण्यात येऊ नये.
40. अर्जदारास ऑनलाईन अर्ज दाखल करतांना प्रत्येक टॅबची माहिती नमुद करणे बंधनकारक राहील. तसेच निगडीत कागदपत्रं अपलोड करणे बंधनकारक राहील.

दिनांकः ई-स्वाक्षरीत नमुद आहे.
ठिकाणः अहिल्यानगर

Digitally signed by
PANKAJ ASHIYA
Date: 11-08-2026
19:29:54

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा सेतु समिती, अहिल्यानगर**

## **आपले सरकार सेवा केंद्र आयडी मिळणेबाबत अर्ज करण्यासाठी**
## **-* आवश्यक कागदपत्रांची यादी *-**

1. पासपोर्ट साईज फोटो
2. इयत्ता 12 वी उत्तीर्ण असलेबाबत गुणपत्रक/प्रमाणपत्र
3. आधार कार्ड प्रत
4. पॅन कार्ड प्रत
5. ज्या भौगोलिक क्षेत्रासाठी अर्ज करावयाचा आहे, त्या भौगोलिक क्षेत्रात रहिवास असलेबाबतचा पुरावा
    - ग्रामपंचायत दाखला
    - तहसिलदार रहिवास प्रमाणपत्र
    - मतदार ओळख पत्र
    - ग्रामपंचायत/नगरपंचायत/नगरपरिषद महानगरपालिका मालमत्ता पत्रक

www.MHAlerts.Com

More info: MHAlerts.Com

**शासन शुध्दीपत्रक दिनांक 09 जूलै 2026 अन्वये गुणांकनावर आधारित निवड निकष (एकूण 100 गुण)**

| निकष | गुण | मूल्यांकनाचे निकष | दाखल करावयाचे आवश्यक कागदपत्रं |
|---|---|---|---|
| शैक्षणिक पात्रता | 10 | किमान उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (HSC) उत्तीर्ण; पदवी, पदविका किंवा व्यावसायिक पात्रतेस अतिरिक्त गुण (किमान शैक्षणिक अहर्ता असल्यास 5 गुण, पदवी असल्यास 2 अतिरिक्त गुण, पदव्युत्तर असल्यास 5 अतिरिक्त गुण) | अर्जदार यांनी त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार अपलोड केलेल्या कागदपत्रांनुसार गुण दिले जातील. |
| संगणक व डिजिटल साक्षरता | 15 | MS-CIT किंवा समकक्ष प्रमाणपत्र, संगणक हाताळणी, ऑनलाइन अर्ज प्रक्रिया, सायबर सुरक्षा यांचे ज्ञान | • MS-CIT **किंवा** CCC उत्तीर्ण असलेले प्रमाणपत्र<br>**किंवा**<br>• सायबर सुरक्षा बाबत शासनाने विहित केलेले प्रशिक्षणाबाबत प्रमाणपत्र |
| पायाभूत सुविधा | 15 | स्वतंत्र कार्यालय, संगणक, प्रिंटर, स्कॅनर, बायोमेट्रिक उपकरण, इंटरनेट, वीज बॅकअप, सीसीटीव्ही, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी सुलभ प्रवेश | • स्वमालकीच्या जागेचे शॉप ॲक्ट लायसन्स / मालकी हक्काचा पुरावा (7/12 किंवा मालमत्ता पत्रक)<br>**किंवा**<br>• जागा भाड्याने घेतली असल्यास कायदेशीर नोंदणीकृत भाडे करारनामा किंवा रु.100/- च्या स्टँप पेपरवर करारनामा<br>• **नाव फलकासह आस्थापनेचा जिओ टॅग फोटो) (Shop Board Photo):** दुकानाचा असा फोटो ज्यामध्ये संगणक, प्रिंटर, स्कॅनर, बायोमेट्रिक उपकरण, इंटरनेट, वीज बॅकअप, सीसीटीव्ही इत्यादी बाबी स्पष्ट दिसतील (Interior) आणि बाहेर लावलेला **मराठीतील नावाचा फलक** स्पष्ट दिसेल (दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी सुलभ प्रवेश) |

www.MHAlerts.com

More info: MHAlerts.Com

| | | | |
|---|---|---|---|
| आर्थिक क्षमता | 10 | आवश्यक गुंतवणूक करण्याची व किमान 6 ते 12 महिने व्यवसाय चालविण्याची आर्थिक क्षमता | • लेखापरीक्षक यांनी प्रमाणित केलेले नेटवर्थ प्रमाणपत्र<br>**किंवा**<br>• राष्ट्रीयकृत किंवा जिल्हा बँकेचे रु.1.00 लक्ष चे सॉलव्हन्सी प्रमाणपत्र |
| ग्राहक सेवा व संवाद कौशल्य (मुलाखतीद्वारे) | 20 | संवाद कौशल्य, तक्रार निवारण क्षमता, प्रामाणिकपणा व नागरिकाभिमुख दृष्टिकोन | मुलाखतीऐवजी परीक्षा घेणेबाबत समितीचा निर्णय अंतिम झाला आहे. |
| अनुभव | 10 | सीएससी, महा-ई-सेवा केंद्र, बँकिंग प्रतिनिधी, ई-गव्हर्नन्स किंवा तत्सम क्षेत्रातील अनुभव | • सी.एस.सी./<br>• सायबर कॅफे/<br>• बँक ग्राहक सेवा केंद्र<br>चालवत असलेबाबत संबंधित एजन्सीचे प्रमाणपत्र |
| व्यवसाय आराखडा व शाश्वतता | 05 | सेवा विस्तार, जनजागृती, आर्थिक व्यवहार्यता आणि व्यवसाय नियोजन | पायाभुत सुविधा व अनुभव असल्याचे सिध्द झाल्यास 05 गुणांक दिले जातील |
| सामाजिक समावेशकता | 05 | शासनाच्या धोरणानुसार दिव्यांग, माजी सैनिक, महिला, स्वयंसहाय्यता गट सदस्य किंवा स्थानिक उद्योजकांना प्राधान्य | 1. **40 टक्के किंवा त्यापेक्षा जास्त** अपंगत्व असलेबाबत **वैद्यकीय दिव्यांगत्व प्रमाणपत्र (Medical Disability Certificate)** **किंवा युनिक डिसॅबिलिटी आयडी UDID कार्ड**<br>2. माजी सैनिक असलेबाबत Discharge Book / Pension Payment Order ची प्रत<br>3. स्वयंसहायता गटाचे (बचत गट) **सदस्य ओळखपत्र, प्रमाणपत्र**<br>4. महिला असलेबाबत आधार कार्ड पुरावा |
| चारित्र्य पडताळणी | 10 | पोलीस पडताळणी, फसवणूक, आर्थिक गैरव्यवहार किंवा शासकीय काळ्या यादीत नसणे | पोलीस विभागाकडील चारित्र्य प्रमाणपत्र (Police Clearance Certificate) |

www.MHAlerts.com

More info: MHAlerts.Com

आपले सरकार सेवा केंद्रबाबत केंद्र शासनाच्या CSC २.० अंतर्गत मार्गदर्शक सूचनेबाबतच्या तरतुदींमध्ये सुधारणा करण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग**
**शासन शुध्दिपत्रक क्रमांक : आसेकें-२०२६/प्र.क्र.९८/TECH-1 (E-1742666)**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ०९ जुलै, २०२६

**संदर्भ:** १. सा.प्र.वि. (माहिती तंत्रज्ञान) विभाग शासन निर्णय क्र. मातंसं-१७१६/प्र.क्र.५१७/३९, दि.१९ जानेवारी, २०१८.
२. सा.प्र.वि. शासन शुद्धिपत्रक क्रमांक:मातंसं-०४८/प्र.क्र.१/२०२५, दिनांक ०२ जून, २०२५
३. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग शासन निर्णय आसेकें-२०२६/प्र.क्र.६३/मातं, दिनांक २३ जून, २०२६. (E-1602482)
४. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५.

**प्रस्तावना:**

सा.प्र.वि. (माहिती तंत्रज्ञान) विभाग शासन निर्णय क्र. मातंसं-१७१६/प्र.क्र.५१७/३९, दि.१९ जानेवारी, २०१८ मधील परिच्छेद क्र. २.५ (क) मध्ये दिनांक ०२ जून, २०२५ रोजीच्या शासन शुद्धिपत्रकान्वये बदल करण्यात आला होता. तथापि, सदर बाबीमध्ये अधिक स्पष्टता आणण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन शुध्दिपत्रक:**

जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यरत सेतू प्रभारी अधिकारी व जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक हे संयुक्तरीत्या अर्जाची छाननी पार पाडतील. तसेच दि. २३/०८/२००२ च्या शासन निर्णयान्वये स्थापित केलेल्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा सेतू समिती समोर सदर प्रस्ताव ठेवून आपले सरकार सेवा केंद्र देण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल. आपले सरकार सेवा केंद्र प्रदान करण्यासाठी त्या-त्या भौगोलिक क्षेत्रात एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास खालीलप्रमाणे प्रक्रिया राबवून गुणांकन करण्यात येईल.

१) समितीव्दारे खालीलप्रमाणे गुणांकनाची व मुलाखतीची प्रक्रिया पार पाडण्यात येईल. तसेच सदर समितीचा निर्णय अंतिम असेल.

२) सदर निवड प्रक्रियेमध्ये १०० गुण निर्धारीत करण्यात येतील तर गुणांची विभागणी खालीलप्रमाणे असेल:-

१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असल्यास ३०- गुण
२) कोणत्याही शाखेचा पदव्युत्तर असल्यास २५-गुण
३) सीएससी केंद्र असल्यास २५ गुण
४) समितीकडील मुलाखतीचे गुण २० - गुण

मुलाखतीच्या गुणांची विभागणी खालीलप्रमाणे राहील:-

- तांत्रिक ज्ञान असल्यास - ०६ गुण
- लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ चे ज्ञान असल्यास ०४ गुण

www.MHAlerts.Com

More info: MHAlerts.Com

➢ सामान्य ज्ञान व व्यक्तिमत्व, सामाजिक क्षेत्रात राबविलेले उपक्रम
अथवा सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्याचा अनुभव असल्यास १० गुण

**“याऐवजी खालीलप्रमाणे वाचावे”**

जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यरत सेतू प्रभारी अधिकारी व जिल्हा समाजकल्याण अधिकारी हे संयुक्तरीत्या अर्जाची छाननी पार पाडतील. तसेच दि. २३/०८/२००२ च्या शासन निर्णयान्वये स्थापित केलेल्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा सेतू समिती समोर सदर प्रस्ताव ठेवून आपले सरकार सेवा केंद्र देण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल. आपले सरकार सेवा केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना गुणवत्तापूर्ण, पारदर्शक, वेळेवर आणि विश्वासार्ह सेवा उपलब्ध करून देण्यासाठी व्हिलेज लेव्हल आंत्रप्रेन्युअर (VLE) यांची निवड केवळ किमान पात्रतेच्या आधारे न करता त्यांची शैक्षणिक गुणवत्ता, डिजिटल कौशल्य, पायाभूत सुविधा, आर्थिक क्षमता, प्रामाणिकपणा आणि नागरिकाभिमुख सेवा देण्याची क्षमता या सर्व बाबींच्या आधारे करण्याच्या अनुषंगाने आपले सरकार सेवा केंद्र प्रदान करण्यासाठी त्या-त्या भौगोलिक क्षेत्रात एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास खालीलप्रमाणे प्रक्रिया राबवून गुणांकन करण्यात येईल.

**१) गुणांकनावर आधारित निवड निकष (एकुण १०० गुण)**

| निकष | गुण | मूल्यांकनाचे निकष |
|---|---|---|
| शैक्षणिक पात्रता | १० | किमान उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (HSC) उत्तीर्ण; पदवी, पदविका किंवा व्यावसायिक पात्रतेस अतिरिक्त गुण (किमान शैक्षणिक अहर्ता असल्यास ५ गुण, पदवी असल्यास २ अतिरिक्त गुण, पदव्युत्तर असल्यास ५ अतिरिक्त गुण) |
| संगणक व डिजिटल साक्षरता | १५ | MSCIT किंवा समकक्ष प्रमाणपत्र, संगणक हाताळणी, ऑनलाइन अर्ज प्रक्रिया, सायबर सुरक्षा यांचे ज्ञान |
| पायाभूत सुविधा | १५ | स्वतंत्र कार्यालय, संगणक, प्रिंटर, स्कॅनर, बायोमेट्रिक उपकरण, इंटरनेट, वीज बॅकअप, सीसीटीव्ही, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी सुलभ प्रवेश |
| आर्थिक क्षमता | १० | आवश्यक गुंतवणूक करण्याची व किमान ६ ते १२ महिने व्यवसाय चालविण्याची आर्थिक क्षमता |
| ग्राहक सेवा व संवाद कौशल्य (मुलाखतीद्वारे) | २० | संवाद कौशल्य, तक्रार निवारण क्षमता, प्रामाणिकपणा व नागरिकाभिमुख दृष्टिकोन |
| अनुभव | १० | सीएससी, महा-ई-सेवा केंद्र, बँकिंग प्रतिनिधी, ई-गव्हर्नन्स किंवा तत्सम क्षेत्रातील अनुभव |
| व्यवसाय आराखडा व शाश्वतता | ०५ | सेवा विस्तार, जनजागृती, आर्थिक व्यवहार्यता आणि व्यवसाय नियोजन |
| सामाजिक समावेशकता | ०५ | शासनाच्या धोरणानुसार दिव्यांग, माजी सैनिक, महिला, स्वयंसहाय्यता गट सदस्य किंवा स्थानिक उद्योजकांना प्राधान्य |
| चारित्र्य पडताळणी | १० | पोलीस पडताळणी, फसवणूक, आर्थिक गैरव्यवहार किंवा शासकीय काळ्या यादीत नसणे |
| **एकूण गुण** | १०० | |

www.MHAlerts.com

More info: MHAlerts.Com

**२) किमान पात्रता:**

अर्जदाराने खालील अटी पूर्ण करणे आवश्यक राहील.

१. किमान वय १८ वर्षे पूर्ण असावे.

२. किमान उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (HSC) उत्तीर्ण असावा.

३. संगणकाचे मूलभूत ज्ञान आवश्यक राहील. MSCIT किंवा समकक्ष प्रमाणपत्रास प्राधान्य देण्यात येईल.

४. संबंधित ग्रामपंचायत/नगरपालिका/महानगरपालिका क्षेत्राचा स्थानिक रहिवासी असावा.

५. आधार क्रमांक, पॅन, बँक खाते व आवश्यक ओळखपत्र उपलब्ध असावे.

६. नैतिक अधःपतन, आर्थिक फसवणूक किंवा सायबर गुन्ह्याबाबत दोषी ठरलेला नसावा.

**३) पायाभूत सुविधा:**

प्रत्येक सेवा केंद्रामध्ये किमान खालील सुविधा असणे आवश्यक राहील.

- किमान १०० चौ.फुट कार्यालयीन जागा
- दोन संगणक/लॅपटॉप
- लेझर प्रिंटर
- स्कॅनर
- बायोमेट्रिक उपकरण
- वेबकॅम
- युपीएस अथवा पर्यायी वीज बॅकअप
- ब्रॉडबँड इंटरनेट ( ग्रामीण 10 mbps नागरी 20 mbps )
- सीसीटीव्ही व्यवस्था
- नागरिकांसाठी प्रतीक्षाकक्ष
- शासनप्राधिकृत सेवा शुल्क दर्शविणारा फलक व बाह्य नामफलक

**४) मुलाखत:**

जिल्हास्तरीय निवड समितीमार्फत अर्जदारांची संरचित मुलाखत घेण्यात येईल. मुलाखतीमध्ये खालील बाबींचे मूल्यांकन करण्यात येईल.

- शासकीय सेवांचे ज्ञान
- नागरिकाभिमुख सेवावृत्ती
- डिजिटल प्रणाली हाताळण्याची क्षमता
- समस्या सोडवण्याची क्षमता
- संवाद कौशल्य
- प्रामाणिकपणा व नैतिकता
- माहिती गोपनीयता व डेटा सुरक्षा याबाबत जागरूकता

www.MHAlerts.Com

**५) कार्यप्रदर्शनावर आधारित करार नुतनीकरण:**

निवड झालेल्या VLE ला प्रारंभी ३ वर्षाचा करार देण्यात यावा. पुढील नुतनीकरण खालील कार्यप्रदर्शन निर्देशकांच्या आधारे करण्यात यावे.

- केलेल्या व्यवहारांची संख्या
- नागरिक समाधान निर्देशांक
- सेवा देण्यास लागणारा सरासरी कालावधी
- प्राप्त तक्रारींची संख्या व त्यांचे निराकरण
- लेखापरिक्षणातील अनुपालन
- प्रणालीची कार्यक्षमता (System uptime)
- आर्थिक शिस्त
- शासनाच्या विविध मोहिमांमध्ये सहभाग

**६) अपात्रता निकष:**

खालील परिस्थितीत अर्जदारास अपात्र ठरवण्यात यावे.

- खोटी किंवा बनावट कागदपत्रे सादर करणे.
- कोणत्याही शासकीय योजनेतून काळ्या यादीत समाविष्ट असणे.
- आर्थिक फसवणूक अथवा सायबर गुन्ह्यांची प्रलंबित गंभीर प्रकरणे असणे.

**७) निवड प्रक्रिया:**

१. अर्जाची प्राथमिक छाननी व पडताळणी.
२. गुणांकनाच्या आधारे कागदपत्रांचे परीक्षण.
३. प्रस्तावित कार्यालयाची प्रत्यक्ष पाहणी.
४. पोलीस पडताळणी.
५. जिल्हास्तरीय निवड समितीमार्फत संरचित मुलाखत.
६. १०० गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी (Merit List) तयार करणे.
७. प्राथमिक निवड यादी प्रसिद्ध करून हरकती मागविणे.
८. अंतिम निवड व नियुक्ती आदेश देणे.
९. अनिवार्य प्रशिक्षण व ६ महिन्यांचा परिविक्षाधिन कालावधी
१०. समाधानकारक कार्यप्रदर्शनानंतर नियमित मान्यता.

**८) अंमलबजावणी:** या शासन शुद्धिपत्रकातील तरतुदी राज्यातील सर्व नवीन आपले सरकार सेवा केंद्रांच्या निवडीस लागू राहतील. तसेच विद्यमान VLE यांचे करार नूतनीकरण करताना देखील या शासन शुद्धिपत्रकातील निकषांचा विचार करण्यात येईल.

www.MHAlerts.Com

More info: MHAlerts.Com

२. सदर शासन शुध्दिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०७०९१३००४६३९११ असा आहे. हे शासन शुध्दिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=EIT and AI, 2.5.4.20=F4FD0AC26AD2A365A8E829907C5E76B911FED9B1B9E48CC2854C4B8A14B0D70C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BEFBB0AE84804C4DA8D35ABF2195EBB1DC727DE9B0A094BEA77F4CA6BE5965DB, cn=DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2026.07.09 13:01:45 +05'30'

**(दुर्गाप्रसाद मैलावरम)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. महाराष्ट्र विधान परिषद सभापती यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
४) मा. महाराष्ट्र विधान सभा अध्यक्ष यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
५) मा. उप मुख्यमंत्री ( नगर विकास व गृहनिर्माण ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
७) सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८) मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद, विधान भवन, मुंबई
९) मा. विरोधी पक्ष नेता, विधान सभा, विधान भवन, मुंबई
१०) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
११) शासनाचे सर्व मा. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
१२) मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,
१३) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१४) महालेखापाल १/२ लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१५) महालेखापाल १/२ लेखा व परीक्षा, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१६) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१७) सर्व पोलीस आयुक्त,
१८) सर्व विभागीय आयुक्त,
१९) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य,
२१) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
२२) सर्व जिल्हाधिकारी,
२३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२४) सर्व नगरपालिका/परिषदांचे मुख्याधिकारी,
२५) सर्व मंत्रालयीन विभाग,
२६) मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
२७) निवडनस्ती

www.MHAlerts.Com

More info: MHAlerts.Com